## आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्तविभाग
## राष्ट्रीय बातमीपत्र
## सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.03.2025** **वारः गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1)जवाहरलाल नेहरु बंदरापासून चौकपर्यंतच्या सहा पदरी ग्रीनफील्ड महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2)कोकण रेल्वे महामंडळाचं भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण केलं जाणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानपरिषदेत घोषणा
3)राष्ट्रपती द्रौपदी मुरमू यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रपती भवनातील अमृत उद्यानात उद्यम उत्सवाचं आयोजन
4)देशाच्या एकंदर वीजनिर्मितीमध्ये हरित ऊर्जा निर्मितीचा वाटा 42 टक्के- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती. आणि
5) दिव्यांगांसाठीच्या खेलो इंडिया स्पर्धांच्या दुसऱ्या आवृत्तीला आजपासून नवी दिल्ली इथं प्रारंभ, महाराष्ट्रातील 78 खेळाडू भाग घेणार

**मंत्रि मंडळ निर्णय**

नवी मुंबईत जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण अर्थात जे एन पी एच्या ग्रीनफील्ड महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजूरी दिली आहे. यासाठी साडेचार हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा महामार्ग जेएनपीए बंदराला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मंत्रीमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भीम-यूपीआयद्वारे छोट्या व्यवहारांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारनं प्रोत्साहन योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत कमी रकमेच्या प्रत्येक व्यवहारावर 15 शतांश टक्के प्रोत्साहन देण्यात येईल. दोन हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांसाठी हा नियम लागू असेल. या निर्णयामुळे छोटे व्यापारी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय यूपीआय सेवांचा लाभ घेऊ शकतील, असं वैष्णव यांनी सांगितलं. या योजनेसाठी सुमारे दीड हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**लोकसभा**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु केली जाणार असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

देशातल्या अनेक मोठ्या शहरातल्या रेल्वे स्थानकांची क्षमता वाढवण्याचं काम सुरु असून यामध्ये पुणे आणि हडपसर इथल्या रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण करुन, या स्थानकांवरुन रेल्वे गाड्यांची संख्या वाढवली जाईल, असंही वैष्णव यांनी सांगितलं.

**विधि मंडळ**

केंद्र सरकारच्या प्रस्तावानुसार, कोकण रेल्वे महामंडळाचं भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण केलं जाणार असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. भविष्यातील प्रकल्पांसाठी तसंच आवश्यक निधीची कमतरता भासू नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. विलिनीकरणानंतर कोकण रेल्वेचं नाव तसंच राहणार असून त्याचं स्वायत्त अस्तित्व कायम ठेवलं जाईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.
राज्यात कायदा सुव्यवस्था कायम राखण्यात अनेक आव्हान आहेत. पण त्यासाठी सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे असं निवेदन मुख्यमंत्र्यांनी काल विधानसभेत दिलं. अर्थ संकल्पातल्या गृह विभागाच्या अनुदानावरील चर्चेला ते उत्तर देत होते. नागपूर हिंसाचार प्रकरणी पोलिसांवर हल्ला करणाऱ्याना अजिबात क्षमा करणार नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. गुन्ह्याच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आठव्या स्थानी असल्याचं ते म्हणाले.
केंद्र शासनाने देशात तीन ठिकाणी न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी एक विद्यापीठ राज्यात नागपुरात उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुरमू आज दिल्लीत राष्ट्रपती भावनातील अमृत उद्यान इथ आयोजित उद्यम उत्सवात सहभागी होणार आहेत . केंद्रीय सूक्ष्म , लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने याच आयोजन केल असून , या उद्योगांतून तयार होणाऱ्या भारतीय पारंपरिक वस्तूंच्या उत्पादनांना प्रोत्साहन आणि बाजारपेठ मिळवून देण हा या उत्सवामागचा उद्देश आहे. यामध्ये महिला स्वयं सहाय्यता गट , पंतप्रधान विश्वकर्मा आणि आदिवासी योजनेतील लघु उद्योजक तसच खादी आणि इतर ग्रामीण लघु उद्योजक यांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांच प्रदर्शन आयोजित करण्यात आल आहे . त्याच बरोबर लोकसंगीत, नुककड नाटक , राजस्थानी पपेट शो , मातीची भांडी तयार करण्याच प्रात्यक्षिक आदि सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले असून हा उत्सव येत्या 30 मार्च पर्यन्त चालेल.

**गडकरी**

देशात सध्या एकंदर वीजनिर्मितीच्या क्षेत्रात हरित ऊर्जा निर्मितीचा वाटा 42 टक्के इतका आहे अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. नवी दिल्लीत काल 32 व्या कनवर्जन्स इंडिया एक्सपो, स्मार्ट मोबईलीटी इंडिया एक्सपो आणि 10 व्या स्मार्ट सिटी इंडिया कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. गडकरी म्हणाले की केंद्र सरकार पर्यायी इंधन आणि आणि जैव इंधन निर्मितीला प्रोत्साहन देत आहे. येत्या भविष्यात देशातील काही शहरांमधील प्रवासाचा वेळ अगदी कमी करण्याच्या दृष्टीने अनेक नवीन रस्ते प्रकल्प सुरू होत असून , त्याद्वारे दिल्ली- डेहराडून , दिल्ली -जयपूर तसच चेन्नई- बंगरुळू या शहरांमधील अंतर केवळ 2 तासात पार करता येईल. तसच दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा प्रवास केवळ 12 तासात करता येईल असही गडकरी यांनी यावेळी सांगितल.

**अमेरिका युक्रेन**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी रशियाविरुद्धच्या युद्धात अंशतः युद्धबंदी करण्यास सहमती दर्शविली आहे, असं अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी काही दिवसांपूर्वी याबाबत चर्चा केली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी झेलेन्स्की यांना पुतिन यांच्याशी झालेल्या संभाषणाची आणि या चर्चेमधील प्रमुख मुद्द्यांची दूरध्वनीवरून माहिती दिली, असं व्हाईट हाऊसनं काल रात्री स्पष्ट केलं.

**कैदी**

तीन वर्षांपूर्वी रशियन लष्करी कारवाई सुरू झाल्यापासून उभय देशांनी प्रत्येकी 175 कैद्यांची देवाणघेवाण केली आहे, असं रशिया आणि युक्रेननं म्हटलं आहे. आत्तापर्यंतची ही कैद्यांची सर्वात मोठी देवाणघेवाण आहे. सर्व युद्धकैद्यांची तसंच पकडलेल्या नागरिकांची सुटका करणं हे शांततेच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल असेल आणि ते दोन्ही देशांमधील विश्वास निर्माण करण्यास मदत करू शकेल, असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटलं आहे.

**गाजा युद्ध**

इस्त्राईलने हमास विरुद्धच्या युद्धात अधिक सैन्य अभियानाचा विस्तार करून गाजा पट्टीवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला असून त्यात किमान 400 पॅलेस्टाईन नागरिक मारले गेल्याचा अंदाज आहे. ऑक्टोबर 2023 पासून इस्त्राईल हमास युद्ध सुरू झाल्यापासून हा सर्वात मोठा हल्ला आहे. इस्त्राईलचे पंतप्रधान बेंज्यामीन नेत्यानाहू यांनी काल इस्त्राईलच्या दूरचित्रवाणी मध्यमावरून बोलताना सांगितल की, आता युद्ध सुरू असतानाच पुढील चर्चा सुरू राहील. इस्त्राईलच्या उरलेल्या बंधकांची सुटका करण्यासाठी युद्धाचा दबाव आणणे जरुरीचे आहे. दरम्यान, गाजावर पुन्हा हल्ले सुरू करण्याच्यापूर्वी अमेरिकेशी आणि ट्रॅम्प प्रशासनाशी चर्चा करण्यात आल्याच व्हाईट हाऊसतर्फे स्पष्ट करण्यात आल आहे.

**स्विसबॅडमिंटन**

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महिला दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत आज भारताची ट्रीसा जॉली आणि तिची जोडीदार गायत्री गोपीचंद यांचा सामना स्वित्झर्लंडमधील बसेल इथं सेलिन हब्श आणि अमेली लेहमन या जर्मन जोडीशी होणार आहे. या भारतीय जोडीनं काल पहिल्या फेरीत स्वित्झर्लंडच्या ॲडलाइन मुलर आणि नेदरलँड्सच्या केली व्हॅन बुइटेन यांचा 12-16,21-17 असा पराभव केला. ऑलिंपिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू हिला काल महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत डेन्मार्कच्या जूली डावल जेकबसन हिच्याकडून पराभव पत्करावा लागला, तर मालविका बनसोड हिला कॅनडाच्या मिशेल ली हिच्याकडून पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत भारताच्या किदाम्बी श्रीकांतनं पहिल्या फेरीत देशाच्या एच.एस. प्रणॉयचा 23-21,23-21 असा पराभव केला.

**खेलो इंडिया**

दिव्यांगांसाठीच्या खेलो इंडिया स्पर्धांच्या दुसऱ्या आवृत्तीला आजपासून नवी दिल्ली इथं प्रारंभ होत आहे. या स्पर्धांमध्ये 36 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील तेराशेहून अधिक खेळाडू भागी घेणार आहेत. 27 तारखेपर्यंत या स्पर्धा चालणार आहेत. नवी दिल्ली इथं जवाहरलाल नेहरू स्टेडियम, इंदिरा गांधी स्टेडियम आणि डॉक्टर करणसिंग नेमबाजी संकुल अशा तीन ठिकाणी या स्पर्धा पार पडणार आहेत. दरम्यान, खेलो इंडिया पॅरा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे 78 क्रीडापटू पात्र ठरले आहेत. सर्वाधिक 36 खेळाडू ॲथलेटिक्समध्ये भाग घेणार आहेत. पॅरीस पॅरा ऑलिम्पिकपटू सुकांत कदम, संदिप सलगर, स्वरूप उन्हाळकर, दिलीप गावीत, भाग्यश्री जाधव यांच्याकडून पदकांची अपेक्षा आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार**